पुढारी पुणे, शुक्रवार, ८ डिसेंबर २०२३



निमगावसावा येथे महामानवास अभिवादन करताना मान्यवर.

# वळसे पाटील महाविद्यालयात अभिवादन

**खोडद :** निमगाव सावा (ता. जुन्नर) येथील दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ व इतिहास विभाग यांच्या वतीने बुधवारी (दि. ६) महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून घोडेगाव येथील बी. डी. काळे महाविद्यालयाच्या प्रा. अर्चना अवताडे उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन केले. मराठी विभागप्रमुख प्रा. प्रल्हाद शिंदे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना बाबासाहेबांच्या विचारांना उजाळा दिला. या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीन मोजाड, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. राहुल सरोदे व इतिहास विभागप्रमुख प्रा. नीलम गायकवाड यांनी केले. या वेळी प्राचार्य डॉ. छाया जाधव, प्रा. प्रकाश कांबळे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सर्व प्राध्यापक वृंद, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. शिवाजी साळवे यांनी केले. प्रा. सुभाष घोडे यांनी आभार मानले.